मा.पंतप्रधानांनी स्वातंत्र्य दिनी जाहिर केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी सन २००४ - २००५ या आर्थिक वर्षात करण्याकरीता अतिरिक्त उद्दिष्ट ठरवून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक :- ग्रापापु-१००५/प्रक्र-२३/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- ३ फेब्रुवारी, २००५

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१००३/प्रक्र-२१०/पापु-०७, दिनांक १४ ऑक्टोंबर, २००३
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. एआरपी-१००३/प्रक्र-१८३/पापु-०८, दिनांक २०.११.२००३
३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१००३/प्रक्र-२१०/पापु-०७, दिनांक २७.२.२००४
४) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००३/प्रक्र-२१०/पापु-०७, दिनांक १६.३.२००४
५) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००४/प्रक्र-६२/पापु-०७, दिनांक २१ एप्रिल, २००४
६) शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ववेका-१००४/प्रक्र-८३/पापु-०८ दिनांक ११ ऑगस्ट, २००४
७) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००३/प्रक्र-२१०/पापु-०७, दिनांक १८ जानेवारी, २००५
८) शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.एआरपी-१००३/प्रक्र-१८३/पापु-०८, दिनांक २५ जानेवारी, २००५

**प्रस्तावना :-**

मा.पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी दिनांक १५ ऑगस्ट, २००२ रोजी राष्ट्रास उद्देशून केलेल्या भाषणात ग्रामीण भागातील पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी, पाणी टंचाई असलेल्या भागात **१ लाख हातपंपाची उभारणी करणे, १ लाख ग्रामीण प्राथमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करणे व पिण्याच्या पाण्याच्या १ लाख पारंपारिक स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे या तीन देशव्यापी कार्यक्रमांची घोषणा केली होती.** सदर कार्यक्रम संपूर्ण देशामध्ये सन २००३-२००४ व सन २००४-२००५ या दोन आर्थिक वर्षात राबवावयाचा आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्यास ठरवून दिलेले उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | वर्ष | हातपंप उभारणी | पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे पुनरुज्जीवन | प्राथमिक शाळेसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे |
|---|---|---|---|---|
| | २००३-२००४ | ५९२५ | ५९२५ | ३७३० |
| २ | २००४-२००५ | ६२६३ | ९००० | ४५६७ |
| ३ | ०४-०५करीता अतिरिक्त | ५०० | ०० | ०० |
| | एकूण | १२६८८ | १४९२५ | ८२९७ |

२. सदर कार्यक्रमांची अंमलबजावणी राज्यात करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भीय क्र.१,३,४,५ व ७ येथील शासन निर्णयान्वये/शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तसेच, कार्यक्रमासाठीचा सन २००३-२००४ या आर्थिक वर्षातील संपूर्ण निधीचे वितरण संदर्भिय दिनांक २०.११.२००३ व दिनांक २५.१.२००५ अन्वये करण्यात आले असून, सन २००४-२००५ या आर्थिक वर्षातील ५०% निधीचे वितरण संदर्भिय दिनांक ११.८.२००४ च्या आदेशान्वये संबंधित जिल्हा परिषदांना करण्यात आले आहे.

३. मा.पंतप्रधानांनी स्वातंत्रदिनी घोषित केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भीय क्र.१ येथील दिनांक १४.१०.२००३ च्या शासन निर्णयान्वये सन २००३-२००४ व सन २००४-२००५ करीता जिल्हा परिषदांना उद्दिष्ट ठरवून देण्यात आले होते. परंतु , दोन वर्षांचे उद्दिष्ट सन २००३-२००४ या एकाच वर्षांत पूर्ण करण्याबाबतच्या सुचना संदर्भिय दिनांक १६ मार्च २००४ च्या परिपत्रकान्वये दिल्या आहेत. सन २००३-२००४ मधील हे उद्दिष्ट जून २००४ पर्यंत पूर्ण करण्यास संदर्भिय दिनांक २१ एप्रिल २००४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली होती. परंतु , हे उद्दिष्ट काही जिल्हा परिषदांना या कालावधीत पूर्ण करता आले नसल्याने ते सन २००४-२००५ मध्ये पूर्ण करण्यास परवानगी मागितली आहे. **संदर्भिय दिनांक २१.४.२००४ च्या शासन निर्णयान्वये सन २००४-२००५ या आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आलेले आहे.** राज्यातील काही जिल्हयांमधील पिण्याच्या पाण्याची टंचाईची परिस्थिती लक्षात घेता काही जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी त्यांना ठरवून देण्यात आलेले उद्दिष्ट वाढवून देण्याची मागणी केली आहे.

४. केंद्र शासनाने राज्यास ठरवून दिलेले व अतिरिक्त मंजूर केलेले उद्दिष्ट विचारात घेऊन सन २००४-२००५ च्या आर्थिक वर्षाकरीता अतिरिक्त उद्दिष्ट ठरवून देण्याची बाब व सन २००३-२००४ या आर्थिक वर्षातील उर्वरित उद्दिष्ट सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन, सन २००३-२००४ या आर्थिक वर्षामधील उद्दिष्ट (या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रातील रकाना-३, रकाना-७ व रकाना-११ मध्ये दर्शविल्यानुसार ) सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात **मार्च २००५ पर्यंत** पूर्ण करण्यास शासन मान्यता देत आहे. परंतु, कोणत्याही परिस्थितीत मार्च २००५ अखेर पर्यंत हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात यावे.

२. मा.पंतप्रधानांनी घोषित केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांसाठी सन २००४-२००५ या आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट संदर्भिय दिनांक २१.४.२००४ च्या शासन निर्णयान्वये ठरवून देण्यात आले आहे.(या शासन निर्णया सोबतच्या विवरणपत्रातील रकाना ४, रकाना-८ व रकाना-१२ मध्ये दर्शविल्यानुसार) केंद्र शासनाने राज्यास ठरवून दिलेले उद्दिष्ट मार्च २००५ अखेर पूर्ण करावयाचे असल्याने राज्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाईची परिस्थिती व जिल्हा परिषदांकडून आलेली मागणी विचारात घेऊन या शासन निर्णयासोबतच्या

विवरणपत्रातील रकाना ५, रकाना-९ व रकाना-१३ मध्ये दर्शविल्यानुसार सन २००४-२००५ करीता सर्व जिल्हा परिषदांना अतिरिक्त उद्दिष्ट ठरवून देण्यात येत आहे. त्यामुळे या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रातील रकाना-६,रकाना-१० व रकाना-१४ मध्ये दर्शविलेले एकूण उद्दिष्ट सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावे.

३. सन २००३-२००४ या आर्थिक वर्षासाठी ठरवून दिलेल्या उद्दिष्टाकरीताचा संपुर्ण निधी संदर्भिय क्रमांक २ येथील २०.११.२००३ व संदर्भिय क्रमांक ८ येथील दिनांक २५.०१.२००५च्या आदेशान्वये वितरीत करण्यात आला आहे. तर सन २००४-२००५ च्या उद्दिष्टाकरीताचा ५०% निधी संदर्भिय क्रमांक ६ येथील दिनांक ११.०८.२००४ च्या आदेशान्वये वितरीत करण्यात आला आहे. या निधी मधून केलेल्या खर्चाचे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र त्वरित पाठविल्यास या कार्यक्रमाकरिता उर्वरित ५०% निधीची मागणी केंद्र शासनाकडे करता येईल.

४. या शासन निर्णया नुसार ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वरिल परिच्छेदात नमूद केल्यानूसार केंद्र शासनाकडून अद्याप ५० % निधीचा दुसरा हप्ता प्राप्त व्हावयाचा असल्याने, या शासन निर्णयान्वये ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदांकडे या कार्यक्रमांसाठीचा ग्रामपंचायतींना वर्ग करावयाचा निधी कमी पडत असल्यास तात्पुरती व्यवस्था म्हणून या कार्यक्रमावरील खर्च जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी मधून भागविण्यास व ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन देण्यास परवानगी देण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून या कार्यक्रमासाठीचा निधी प्राप्त होताच जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी मधून केलेल्या खर्चाची प्रतीपुर्ती करण्यात यावी.

५. या कार्यक्रमांची अंमलबजावणी संदर्भिय दिनांक १४.१०.२००३ च्या शासन निर्णया मधील मार्गदर्शक सुचनांनुसार ग्रामस्तरावरून करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत जिल्हा स्तरावरून या योजनेची अंमलबजावणी करण्यात येऊ नये.

६. या कार्यक्रमांतर्गत खोदण्यात येणाऱ्या विंधण विहिरींची खोली कोणत्याही परिस्थितीत ६० मीटर पेक्षा जास्त राहणार नाही याबाबतची सुचना संबधीत ग्रामपंचायतीस/ ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस देण्यात यावी. तसेच, या कार्यक्रमांतर्गत वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा दर्जा राखण्याबाबतही संबधीत ग्रामपंचायतीस / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस सूचीत करण्यात यावे.

७. या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा विहित नमुन्यातील मासिक अहवाल संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचेमार्फत दरमहा पाठविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुधाकर ज्ञा.बोबडे)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
२. विभागीय आयुक्त (सर्व)
३. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई

\\Ws07a\d\G P Folder 03\s r 23 2005 (GP) Prime minister doc
एच-४९३-२

४. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
९. तहसीलदार (सर्व)
१०. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
११. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
१२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१४. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिकी उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१७. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१८. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१९. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२०. मंत्रालयातील सर्व विभाग
२१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
२२. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

एप-४९३-२अ

## विवरणपत्र

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००५ /प्रक्र-२३/पापु-०७, दि.३ फेब्रुवारी, २००५ चे सहपत्र

| अ.क्र. | जिल्हा परिषद | हातपंप उभारणी | | | | पिण्याच्या पाण्याच्या पारंपारिक स्त्रोताचे पुनरुज्जीवन | | | | प्राथमिक शाळेसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शा.नि. दिनांक १४.१०.०३ अन्वये सन ०३-०४ व सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले एकूण उद्दिष्ट | शा.नि. दिनांक २१.०४.०४ अन्वये सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले उद्दिष्ट | सन ०४-०५ साठी या शा.नि. अन्वये ठरवून दिलेले अतिरिक्त उद्दिष्ट | एकूण उद्दिष्ट | शा.नि. दिनांक १४.१०.०३ अन्वये सन ०३-०४ व सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले एकूण उद्दिष्ट | शा.नि. दिनांक २१.०४.०४ अन्वये सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले उद्दिष्ट | सन ०४-०५ साठी या शा.नि. अन्वये ठरवून दिलेले अतिरिक्त उद्दिष्ट | एकूण उद्दिष्ट | शा.नि. दिनांक १४.१०.०३ अन्वये सन ०३-०४ व सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले एकूण उद्दिष्ट | शा.नि. दिनांक २१.०४.०४ अन्वये सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले उद्दिष्ट | सन ०४-०५ साठी या शा.नि. अन्वये ठरवून दिलेले अतिरिक्त उद्दिष्ट | एकूण उद्दिष्ट |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | ठाणे | १०६ | ५३ | ४० | १९९ | १०६ | ५३ | १०० | २५९ | ५१ | २५ | ७५ | १५१ |
| २ | रायगड | १०६ | ५३ | ४० | १९९ | १०६ | ५३ | १०० | २५९ | १०० | ७० | ७५ | २४५ |
| ३ | रत्नागिरी | १०६ | ५३ | ४० | १९९ | १०६ | ५३ | १०० | २५९ | १५० | ७० | ७५ | २९५ |
| ४ | सिंधुदुर्ग | ११५ | ५७ | २५ | १९७ | ११५ | ५७ | १०० | २७२ | १५० | ७० | ७५ | २९५ |
| ५ | नाशिक | ३५० | ३३२ | ४३ | ७२५ | ३५० | २०० | १७५ | ७२५ | ५१ | ५० | १०० | २०१ |
| ६ | धुळे | १०६ | ५३ | ५० | २०९ | १०६ | ५३ | १७५ | ३३४ | १०० | ७० | १०० | २७० |
| ७ | नंदूरबार | १०६ | ५३ | ५० | २०९ | १०६ | २० | १७५ | ३०१ | १४० | ७० | ७५ | २८५ |
| ८ | जळगाव | १०६ | ५३ | ५० | २०९ | १०६ | ५३ | १७५ | ३३४ | १४० | ७० | ७५ | २८५ |
| ९ | अहमदनगर | ३५० | १७५ | ५० | ५७५ | ३५० | १७५ | १७५ | ७०० | १५० | ८० | ७५ | ३०५ |
| १० | पुणे | ३५० | १७५ | १७५ | ७०० | ३५० | १७५ | ३४० | ८६५ | १५० | ७० | ७५ | २९५ |
| ११ | सातारा | ३५० | २९० | ५० | ६९० | ३५० | २८१ | १७५ | ८०६ | १४० | ७० | ७५ | २८५ |
| १२ | सांगली | ३५० | ४१५ | ५० | ८१५ | ३५० | १७५ | १७५ | ७०० | १४० | ७० | ७५ | २८५ |
| १३ | सोलापूर | ३५० | १७५ | ५० | ५७५ | ३५० | १७५ | १७५ | ७०० | १४० | ७० | ७५ | २८५ |
| १४ | कोल्हापूर | १०६ | ५३ | ५० | २०९ | १०६ | ५३ | १७५ | ३३४ | २०० | ८० | ७५ | ३५५ |
| १५ | औरंगाबाद | ३५० | १७५ | ५० | ५७५ | ३५० | १७५ | १७५ | ७०० | १४० | ७० | ७५ | २८५ |
| १६ | जालना | १०६ | ५३ | ५० | २०९ | १०६ | ५३ | १७५ | ३३४ | १४० | ७० | ७५ | २८५ |
| १७ | परभणी | १०६ | ५३ | १०० | २५९ | १०६ | ५३ | १७५ | ३३४ | ५१ | २६ | ७५ | १५२ |
| १८ | हिंगोली | १०६ | ५३ | १०० | २५९ | १०६ | ५३ | १७५ | ३३४ | ५१ | २५ | ७५ | १५१ |

पृष्ठ-४७३-३अ

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००५ /प्रक्र-२३/पापु-०७, दि.३ फेब्रुवारी, २००५ चे सहपत्र

| अ.क्र. | जिल्हा परिषद | हातपंप उभारणी | | | | पिण्याच्या पाण्याच्या पारंपारिक स्त्रोताचे पुनरुज्जीवन | | | | प्राथमिक शाळेसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शा.नि. दिनांक १४.१०.०३ अन्वये सन ०३-०४ व सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले एकूण उद्दिष्ट | शा.नि. दिनांक २१.०४.०४ अन्वये सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले उद्दिष्ट | सन ०४-०५ साठी या शा.नि. अन्वये ठरवून दिलेले अतिरिक्त उद्दिष्ट | एकूण उद्दिष्ट | शा.नि. दिनांक १४.१०.०३ अन्वये सन ०३-०४ व सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले एकूण उद्दिष्ट | शा.नि. दिनांक २१.०४.०४ अन्वये सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले उद्दिष्ट | सन ०४-०५ साठी या शा.नि. अन्वये ठरवून दिलेले अतिरिक्त उद्दिष्ट | एकूण उद्दिष्ट | शा.नि. दिनांक १४.१०.०३ अन्वये सन ०३-०४ व सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले एकूण उद्दिष्ट | शा.नि. दिनांक २१.०४.०४ अन्वये सन ०४-०५ साठी ठरवून दिलेले उद्दिष्ट | सन ०४-०५ साठी या शा.नि. अन्वये ठरवून दिलेले अतिरिक्त उद्दिष्ट | एकूण उद्दिष्ट |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १९ | बीड | ३५० | १७५ | ५० | ५७५ | ३५० | १७५ | १७५ | ७०० | १४० | ७० | १०० | ३१० |
| २० | नांदेड | १०६ | ५३ | १५० | ३०९ | १०६ | ५३ | १७५ | ३३४ | १०० | ७० | १०० | २७० |
| २१ | उस्मानाबाद | ३५० | १७५ | १०० | ६२५ | ३५० | १७५ | १७५ | ७०० | १४० | ७० | १०० | ३१० |
| २२ | लातूर | ३५० | १७५ | १०० | ६२५ | ३५० | १७५ | १७५ | ७०० | ५१ | २६ | १०० | १७७ |
| २३ | बुलढाणा | १०४ | ५२ | १०० | २५६ | १०४ | ५२ | १७५ | ३३१ | १४० | ७० | १०० | ३१० |
| २४ | अकोला | १०४ | ५२ | ३५० | ५०६ | १०४ | ५२ | ३७५ | ५३१ | १४० | ७० | १०० | ३१० |
| २५ | वाशिम | १०४ | ५२ | १०० | २५६ | १०४ | ५२ | १७५ | ३३१ | ५१ | २५ | ७५ | १५१ |
| २६ | अमरावती | १०४ | १५० | १०० | ३५४ | १०४ | ५२ | १७५ | ३३१ | १०० | ७० | १०० | २७० |
| २७ | यवतमाळ | १०४ | ५२ | ३५० | ५०६ | १०४ | ५२ | १७५ | ३३१ | १४० | ७० | १०० | ३१० |
| २८ | वर्धा | १०४ | ५२ | १०० | २५६ | १०४ | ५२ | १७५ | ३३१ | ५१ | २६ | १०० | १७७ |
| २९ | नागपूर | १०४ | ८० | १५० | ३३४ | १०४ | ५२ | १७५ | ३३१ | २०० | ० | ४७ | २४७ |
| ३० | भंडारा | १०४ | ५२ | २०० | ३५६ | १०४ | ५२ | २७५ | ४३१ | ५१ | २५ | १०० | १७६ |
| ३१ | गोंदिया | १०४ | ५२ | १०० | २५६ | १०४ | ५२ | १७५ | ३३१ | ५१ | २६ | ७५ | १५२ |
| ३२ | चंद्रपूर | १०४ | ५२ | १०० | २५६ | १०४ | ५२ | १७५ | ३३१ | १४० | ५० | ७५ | २६५ |
| ३३ | गडचिरोली | १०४ | ५२ | ५० | २०६ | १०४ | ५२ | १७५ | ३३१ | ५१ | २६ | ७५ | १५२ |
| | एकुण | ५९२५ | ३६०० | ३१६३ | १२६८८ | ५९२५ | ३०६० | ५९४० | १४९२५ | ३७३० | १८२० | २७४७ | ८२९७ |

--------